# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

९वा मजला, न्यु. एक्सेलसियर बिल्डींग,
ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१.

दुरध्वनी : ०२२ - २२०७ ३७१९ / २८
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : ara@maha-ara.org

क्रमांक : बैठक-१८२४/प्र.क्र. ३९२/प्रनिप्रा/२० मे/२०२५/551 दिनांक : 28 MAY 2025

## :: १०२व्या बैठकीचे इतिवृत्त ::

**श्री. समीर कुमार बिस्वास**, भा.प्र.से. (से.नि.), अध्यक्ष, **प्रवेश नियामक प्राधिकरण** यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार, दिनांक २० मे, २०२५ रोजी सकाळी ११:३० वा. झालेल्या प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या क्रमांक **१०२व्या बैठकीचे इतिवृत्त**,-

सदरील बैठकीस श्री. दिलीप सरदेसाई (भा.प्र.से.), सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य हे बैठकीस उपस्थित होते.

तसेच प्राधिकरणाचे सदस्य १) डॉ. राजेंद्र शिवाजी बंगाळ, कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, १) डॉ. वि.म. मोहितकर, संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई, ३) डॉ. शैलेंद्र देवळाणकर, संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, म.रा. व ४) श्री. रावसाहेब भागडे, (भा.प्र.से.), सदस्य सचिव तथा महासंचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे हे अनुपस्थित होते. याबाबत नोंद घेण्यात आली.

तसेच १) डॉ. वाय.सी. साळे, संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, पुणे व २) श्री. महेंद्र कोठावदे, उपकुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक (दूरदृष्यप्रणालीद्वारे) विशेष निमंत्रित उपस्थित होते.

हि बैठक कोरम (Quoram) अभावामुळे अर्धा तास तहकुब करुन त्याच ठिकाणी घेण्यात आली.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

**विषय क्रमांक १ :** प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई या दोन्ही कार्यालयांशी संबंधित मुंबई, नागपूर व छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी उच्च न्यायालयातील न्यायालयीन प्रकरणे हाताळण्यासाठी पॅनलवरील नियुक्त वकीलांच्या शुल्क वाढीबाबत (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्रमांक १४ वरील निर्देश)

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही कार्यालयांतील न्यायालयीन प्रकरणे हाताळणा-या मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर येथील मा. उच्च न्यायालयातील वकीलांच्या मोबदला वाढीबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण व आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी प्रस्ताव सादर केला.

प्रस्तुत प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक तसेच इतर प्राधिकरण स्तरावर पॅनलवरील नियुक्त वकिलांच्या शुल्काबाबत माहिती सादर करण्यात आली व यावर सखोल चर्चा झाली, चर्चेअंती महाराष्ट्र शासनाच्या विधी व न्याय विभागाने शासन निर्णय क्र. Meeting-GPH-२०२३/ C.R.२९/ D-१४, दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने सरकारी वकिलांच्या मोबदल्यामध्ये केलेली सुधारणा विचारात घेण्याबाबत एकमत झाले. सदर शासन निर्णयातील तरतूद खालील प्रमाणे आहे,-

Fees for Government Pleader/'A' Panel Counsel/Additional Government Pleader/ Assistant Government Pleader/ 'B' Panel Counsel, Bombay High Court, (Original Side, Appellate Side, Writ Cell) and at Nagpur and Chhatrapti Sambhaji Nagar,-

| Sr. No. | Fees (In Rupees) | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Appearance In Court | | | | | |
| | a. | Full Day Hearing (over both morning and afternoon sitting of Court) | : | GP<br>Addl. GP<br>Asst. GP | -<br>-<br>- | Rs.10,000/-<br>Rs. 7,500/-<br>Rs. 5,000/- |
| | b. | Hearing (during only one sitting of the Court) | : | GP<br>Addl. GP<br>Asst. GP | -<br>-<br>- | Rs.5,000/-<br>Rs. 3,750/-<br>Rs. 2,500/- |
| | c. | Adjournment after short arguments | : | GP<br>Addl. GP<br>Asst. GP | -<br>-<br>- | Rs. 3,750/-<br>Rs. 2,500/-<br>Rs. 1,875/- |
| | d. | Adjournment or brief to hear judgment to submit to orders/directions. | : | GP<br>Addl. GP<br>Asst. GP | -<br>-<br>- | Rs. 2,500/-<br>Rs. 1,850/-<br>Rs. 1,250/- |
| | (Note:- The concerned Government pleader/public Prosecutor shall certify that the fees has been claimed in the correct category in respect of each matter. The above scale of fees shall also apply at the appellate stage). | | | | | |

| 2 | Drafting Fees | Government Pleader/ Additional Government Pleader/ 'A' Panel Counsel Fees | Assistant Government Pleader/'B' Panel Counsel Fees (In Rupees) |
|---|---|---|---|
| A | Writ Petition | | |
| | 1. Brief to draw petition | 10,000/- | 5,000/- |
| | 2. Brief to draw affidavit | 7,500/- | 3,750/- |
| B | Appeals/Revisions in the High Court | | |
| | 1. Brief to settle Revision Petition, Memorandum of appeal. | 5,000/- | 2,500/- |
| | 2. Affidavits | 5,000/- | 2,500/- |
| | 3. Civil Applications | 1,850/- | 1,250/- |
| | 4. Caveat | 1000/- | 1000/- |

- Note: - No fees shall be charged or claimed by Panel Advocates for Conferences.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<u>निर्णय.-</u>

प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष या दोन्ही कार्यालयांतील न्यायालयीन प्रकरणे हाताळणा-या मुंबई, नागपूर, छत्रपती संभाजीनगर येथील मा. उच्च न्यायालयातील वकीलांच्या मोबदल्याबाबत विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र. Meeting-GPH-२०२३/C.R.२९/D-१४ dated ३०/१०/२०२३ नुसार उक्त तालिकेतील नमूद दर निश्चित करण्यात आले आहेत. उक्त शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या वकीलांच्या तीन स्तरांऐवजी प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या पॅनलसाठी वरिष्ठ श्रेणी (पंधरा वर्षापेक्षा अधिक अनुभव असलेले (Group - A)) व कनिष्ठ श्रेणी (पाच ते पंधरा वर्ष अनुभव असलेले Group - B) असे दोनच स्तर तयार करण्याचे निर्देश देण्यात आले.

त्या अनुषंगाने विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्र. Meeting-GPH-२०२३/C.R.२९/D-१४ dated ३०/१०/२०२३ नुसार प्रवेश नियामक प्राधिकरण व राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्या वकीलांच्या पॅनलवरील वकिलांना खालील प्रमाणे मोबदला दरांस मान्यता देण्यात आली. सदरचे मान्यता देण्यात आलेले दर दिनांक ०१/०५/२०२५ पासूनच्या न्यायालयीन प्रकरणांना लागु राहतील. त्यानुषंगाने, सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी या संदर्भात पुढील कार्यवाही करावी,-

| Sr. No. | | Fees (In Rupees) | | |
|---|---|---|---|---|
| 1 | Appearance In Court | | | |
| | a. | Full Day Hearing (over both morning and afternoon sitting of Court) | Group - A | Rs.10,000/- |
| | | | Group – B | Rs. 7,500/- |
| | b. | Hearing (during only one sitting of the Court) | Group - A | Rs.5,000/- |
| | | | Group – B | Rs. 3,750/- |
| | c. | Adjournment after short arguments | Group - A | Rs. 3,750/- |
| | | | Group – B | Rs. 2,500/- |
| | d. | Adjournment or brief to hear judgment to submit to orders/directions. | Group - A | Rs. 2,500/- |
| | | | Group – B | Rs. 1,850/- |
| **2** | | **Drafting Fees** | **"Group - A"** | **"Group – B"** |
| | a) | Writ Petition | | |
| | 1. | Brief to draw petition | 10,000/- | 5,000/- |
| | 2. | Brief to draw affidavit | 7,500/- | 3,750/- |
| | b) | Appeals/Revisions in the High Court | | |
| | 1. | Brief to settle Revision Petition, Memorandum of appeal. | 5,000/- | 2,500/- |
| | 2. | Affidavits | 5,000/- | 2,500/- |
| | 3. | Civil Applications | 1,850/- | 1,250/- |
| | 4. | Caveat | 1000/- | 1000/- |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य

विषय क्रमांक २ : **शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये के.डी.एम्.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे येथे व्यावसायिक पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. विश्वनाथ सत्यवान माळी या विद्यार्थ्याच्या प्रवेशाबाबत मा. उच्च न्यायालयाचे, संभाजीनगर खंडपीठ येथे दाखल याचिका क्र. १९०४/२०२५ मधील दिनांक १२/०२/२०२५ रोजीचे पारित आदेश (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्रमांक १२ वरील निर्देश)**

प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये के.डी.एम्.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे येथे व्यावसायिक पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. विश्वनाथ सत्यवान माळी यांच्या प्रवेश प्रकरणी सुनावणी घेण्यात आली, सदरील सुनावणी महाविद्यालयाच्या वतीने डॉ. कलिम अन्सारी, उप प्राचार्य, के.डी.एम.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे व कु. विश्वनाथ माळी, संबंधित विद्यार्थी उपस्थित होते.

कु. विश्वनाथ माळी यांच्या प्रवेशांबाबत सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी प्राधिकरणाच्या दिनांक १६/०४/२०२५ रोजीच्या बैठकीत सादर केलेल्या टिपणीवर वस्तूस्थिती सादर करण्यात आली होती तद्नुषंगाने सदरील प्रकरणी सांगोपांग चर्चा करण्यात आली. सुनावणी दरम्यान डॉ. कलिम अन्सारी, उप प्राचार्य यांनी खालील बाबी प्राधिकरणास सादर केल्या,-

- सदरील विद्यार्थ्यास केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत Stray Vacancy Round मध्ये के.डी.एम्.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे या महाविद्यालयामध्ये प्राप्त झाला होता.
- परंतु, विद्यार्थी महाविद्यालयामध्ये विहित कालावधीमध्ये उपस्थित राहिला नाही.
- तद्नंतर विद्यार्थ्याने संस्थास्तरावरील प्रवेशासाठी महाविद्यालयाकडे अर्ज केला होता.
- परंतु, Stray Vacancy Round मध्ये विद्यार्थ्याने प्रवेश न घेतल्याने तो संस्थास्तरावरील प्रवेशासांठी पात्र विद्यार्थ्यांच्या यादीमध्ये समाविष्ट नव्हता, हि बाब महाविद्यालयास ज्ञात होती.
- संस्थास्तरावरील प्रवेशासाठी एकूण २० जागा उपलब्ध होत्या. सदरील २० जागांवर एकूण ०८ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाकडे प्रवेशासाठी अर्ज सादर केले होते.सदरील प्राप्त ०८ अर्जांपैकी ०२ विद्यार्थी कु. विश्वनाथ सत्यवान माळी आणि कु. पारस ईश्वर चौधरी यांना प्रवेश देण्यात आला.
- उपरोक्त नमूद ०२ विद्यार्थ्यांपैकी कु. पारस ईश्वर चौधरी हा विद्यार्थी सामाईक प्रवेश परीक्षेमध्ये पात्रतेचे गुण प्राप्त करीत नसल्याने सदरील विद्यार्थ्याचा प्रवेश रद्द करण्यात आला.
- तर, कु. विश्वनाथ सत्यवान माळी हा विद्यार्थी प्रवेश पात्रतेचे निकष पुर्ण करीत असल्याने, सदर विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्यतेचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता.
- उपरोक्त नमूद दोन्ही विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतरसुद्धा महाविद्यालयामध्ये १८ जागा रिक्त होत्या.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

➢ सद्यस्थितीमध्ये संबंधित विद्यार्थ्याने प्रथम वर्षाची परीक्षा दिली आहे. तरी संबंधित विद्यार्थ्याचे शैक्षणिक हित व वरील सर्व परिस्थितीचा सहानुभूतीपुर्वक विचार करता, संबंधित विद्यार्थ्याच्या प्रवेश मान्य करण्याची महाविद्यालयाकडून विनंती करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, कु. विश्वनाथ माळी या विद्यार्थ्याने सुनावणी दरम्यान वैयक्तिक घरगुती अडचणीमुळे Stray Vacancy Round मध्ये सदर महाविद्यालयामध्ये प्रवेश प्राप्त होऊन सुद्धा विहित कालावधीत उपस्थित राहणे शक्य झाले नाही, त्यामुळे संस्थास्तरावरील प्रवेशासाठी अर्ज सादर केला. तरी, मा. महोदयांनी प्रवेशास मान्यता प्रदान करावी अशी विनंती केली.

वरील बाबी विचारात घेता कु. विश्वनाथ माळी प्रथम वर्ष होमिओपॅथिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता पात्रतेचे निकष पूर्ण करीत असल्याची बाब सकृत दर्शनी स्पष्ट आहे. या अनुषंगाने खालील निर्णय घेण्यात आला.

<u>निर्णय.-</u>

के.डी.एम्.जी होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज, शिरपुर, धुळे येथील शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष व्यावसायिक पदवी होमिओपॅथी अभ्यासक्रमास प्रवेशित कु. विश्वनाथ सत्यवान माळी यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

परंतू प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयाकडून निष्काळजीपणा झाल्याचे दिसून येत आहे. या कारणास्तव संबंधित महाविद्यालयास रुपये १.० लाख दंड आकारण्याचा निर्णय प्राधिकरणाने घेतला आहे. सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००0३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे निर्णय संबंधित व्यक्ती/संस्था यांना प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<u>विषय क्रमांक ३ : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर PH२५७७ या महाविद्यालयात प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली या विद्यार्थिनीने प्रवेश मान्यतेबाबत (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय बाब क्रमांक ०६ वरील निर्देश).</u>

प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली यांच्या प्रवेश प्रकरणी सांगोपांग चर्चा करण्यात आली.

कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली या विद्यार्थिनीच्या पालकांनी दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या Restoration Application: U/O - ९ Rule - ४ of Civil Procedure Code, १९०८ या विषयाच्या अर्जान्वये खालीलप्रमाणे विनंती केली आहे.

"१. मा. सर्वोच्च न्यायालयाचे Suo Motu Writ Petition (C) No. ३ of २०२० मधील निर्देशाचे अवलोकन करुन पुनर्विलोकन अर्जावर मे. न्यायकार्यासनाने दि.२२/०६/२०२२ रोजी दिलेले आदेश रद्दबातल करण्यात यावेत.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश, न्यायाचे मुळ तत्व, नैसर्गिक न्यायतत्त्व, Aggrieved Party, inclusion of necessary party to the proceeding, अर्जदाराने जाणीवपुर्वक कोणताही विलंब केलेला नसल्यामूळे, अपरिहार्य अडचणीमुळे जात पडताळणी समितीने विलंबाने दिलेले जात वैधता प्रमाणपत्र, सादर करण्याकरीता केवळ २३ दिवसांचा झालेला विलंब माफ करावा व अर्जदाराचा अर्ज मंजूर करून नियमित प्रवेशास मान्यता देण्यात यावी."

अर्जदाराने अर्जात उल्लेख केलेल्या Suo motu Writ Petition (c) No.३ of २०२० प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णयाचे अवलोकन करण्यात आले.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित सदर विद्यार्थिनी OBC या राखीव प्रवर्गाची असली तरी तिचा प्रवेश Seat Type - After CAP मधून झालेला असून, सदर विद्यार्थिनीने दिनांक ०८/१०/२०२१ रोजीचे OBC जातीचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त सादर केलेले आहे.

वरील बाबीं विचारात घेता दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास प्रवेशित कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली यांच्या प्रवेश प्रकरणी खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला,-

<u>निर्णय,-</u>

कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली या विद्यार्थिनीच्या पालकांनी दिनांक २४/०१/२०२५ रोजीच्या Restoration Application: U/O - ९ Rule - ४ of Civil Procedure Code, १९०८ या विषयाच्या अर्जान्वये सादर केलेल्या मा. सर्वोच्च न्यायालयाचे Suo Motu Writ Petition (C) No. ३ of २०२० मधील निर्देशास अनुसरुन, कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली यांचा जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरिता झालेला विलंब क्षमापित करण्यात आला. त्या अनुषंगाने, दयानंद ईन्स्टिटयुट ऑफ फार्मसी, लातुर या महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये व्यावसायिक प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमास ACAP जागेवर प्रवेशित कु. इनामदार सय्यदा आयेशा मुकतेदार अली यांच्या प्रवेशास प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात आली.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

<u>विषय क्रमांक ४ :</u> <u>शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतची प्रलंबित प्रकरणे फेरपडताळणी करुन प्राधिकरणाच्या निर्णयाकरिता सादर करणे (संदर्भ प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्रमांक ९,१० व ११ मधील निर्देश.</u>

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंत प्राप्त झालेल्या व तत्कालीन मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या स्तरावर अमान्य झालेल्या पुनर्विलोकन याचिका प्रकरणी संबंधित महाविद्यालये व विद्यार्थी यांनी सादर केलेल्या समर्पक कागदपत्रांच्या अनुषंगाने पुनश्च शहानिशा/तपासणी करुन पात्रतेबाबतचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी सादर करण्याच्या निर्देशांकरिता मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील विषय क्र.९, १० व ११ अन्वये घेतलेला निर्णय खालील प्रमाणे :-

"शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पर्यंतच्या विविध व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संबंधित संचालकांनी अथवा प्राधिकरणाच्या निर्देशानुसार गठित करण्यात आलेल्या उपसमितीच्या अहवालामध्ये दर्शविलेल्या त्रुटींमुळे अमान्य प्रवेश प्रकरणी पुनर्विलोकन याचिका सादर करण्यात आल्या होत्या. सदर याचिका प्रकरणी तत्कालीन मा. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी परिपूर्ण कागदपत्रांअभावी पुनर्विलोकन याचिका अमान्य करण्यात आल्या होत्या. सदर याचिका प्रकरणी महाविद्यालय / विद्यार्थी यांच्याकडून पुनःश्च कागदपत्रांसह प्रवेश मान्य करण्यासाठी विनंती अर्ज सादर करण्यात आले आहेत. सदर पुनर्विलोकन याचिका अमान्य केलेल्या व प्रवेशांना मान्यता न झालेल्या विद्यार्थ्यांचा तपशील/आकडेवारी प्राधिकरणाच्या बैठकीत प्रपत्र-ब, प्रपत्र-क व प्रपत्र-ड नुसार सादर करण्यात आलेली असुन तद्नुषंगाने प्रस्तूत प्रकरणी सांगोपांग चर्चा करण्यात आली".

या संदर्भात नमूद त्रुटींबाबत बहुतांशी महाविद्यालयांनी त्रुटींच्या पूर्ततेबाबत आवश्यक कागदपत्रे प्राधिकरणास सादर केली असल्याची बाब प्राधिकरणाच्या निदर्शनास आणून देण्यात आली. परंतू याबाबत तपासणी / छाननी होऊन प्राधिकरण स्तरावर निर्णय होणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले.

या प्रस्तूत प्रकरणी महाविद्यालयांकडून सादर केलेल्या कागदपत्रांच्या अनुषंगाने सदरील त्रुटींची तपासणी / छाननी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांच्या स्तरावर करुन त्याचा स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याबाबत त्यासाठी खालील प्रमाणे मागदर्शक तत्वांचा वापर करण्याचे निर्देश दिले,-

(अ) संबंधित संचालक अथवा उपसमितीने दर्शविलेल्या त्रुटींचे अवलोकन करुन नस्तीप्रमाणे

(आ) उपरोक्त कामकाज शैक्षणिक वर्ष /अभ्यासक्रम निहाय प्राधान्यक्रम ठरवून सादर करणे.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

(इ) सदरील त्रुटींस अनुसरुन महाविद्यालयांनी सादर केलेला समर्पक खुलासा व कागदपत्रे / प्रमाणपत्रांची तपासणी / छाननी करणे,

(ई) संबंधित प्रवेश प्रकरणी प्राप्त कागदपत्रांनुसार त्रुटींची पूर्तता पूर्ण होऊन विहित केलेल्या नियमांनुसार विद्यार्थी प्रवेशास पात्र /अपात्रतेबाबत खातरजमा करणे,

(उ) ज्या प्रवेश प्रकरणी त्रुटींची पूर्तता सादर केली नसल्याचे अथवा अपूर्ण माहिती सादर केली असल्याचे निदर्शनास आल्यास, तसा अहवाल सादर करणे,

(ऊ) प्राप्त माहिती / कागदपत्रांच्या आधारे पात्र / अपात्र विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्ष / अभ्यासक्रम / महाविद्यालय / विद्यार्थी निहाय अहवाल सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण यांनी मा. प्राधिकरणाच्या बैठकीत उचित निर्णयाकरिता सादर करणे,

(ऋ) ज्या प्रवेशांबाबत विद्यार्थी राखीव प्रवर्गानुसार पात्रतेचे निकष पूर्ण करीत नसेल परंतू प्रवेशित सवंर्ग / प्रवर्गानुसार विद्यार्थी प्रवेशास पात्र ठरत असल्यास, योग्य त्या शिफारशीसह अहवाल प्रवेश मान्यतेकरिता प्राधिकरणास सादर करणे,

(ऌ) ज्या प्रवेश प्रकरणी विद्यार्थी प्रवेशित संवर्ग / प्रवर्गानुसार पात्रतेचे निकष पूर्ण करीत नसल्यास, संबंधीत प्रकरणे प्राधिकरण स्तरावर अंतिम निर्णय पारीत करुन निकाली काढण्यासाठी कारणांसह सादर करणे.

उपरोक्त प्रमाणे सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांनी प्राधान्य क्रमाने छाननी / पडताळणी / तपासणी करुन त्याचा अहवाल प्राधिकरणासमोर मान्यतेसाठी तीन महिन्यांच्या आत सादर करवा, असे निर्देश देण्यात आले आहेत.

त्या अनुषंगाने या प्रकरणी महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने, विद्यार्थ्यांच्या त्रुटीबाबतच्या कागदपत्रांची पुर्तता होत असल्याची प्रकरणनिहाय शहानिशा/तपासणी करुन त्याचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे. (यादी सोबत – अभ्यासक्रमनिहाय/शैक्षणिक वर्ष)

| विभाग | मागील बैठकितील प्रकरणे (विद्यार्थी संख्या) | | | मान्यतेसाठी शिफारस करण्यात येणारी एकूण प्रकरणे (विद्यार्थी संख्या) | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुद्दा क्र.९ | मुद्दा क्र.१० | मुद्दा क्र.११ | मुद्दा क्र.९ | मुद्दा क्र.१० | मुद्दा क्र.११ | |
| उच्चशिक्षण | ३२३६+२१६ | १३ | ७४ | १२५८ | ०० | ०० | १२५८ |
| तंत्रशिक्षण | ५२१ | ३५ | १२ | ३३२ | ०१ | ०८ | ३४१ |
| वैद्यकिय शिक्षण | १७८ | २० | ४७ | १६३ | ०० | ०० | १६३ |
| आयुष शिक्षण | ८५ | २८ | ६३ | ६७ | ०५ | २९ | १०१ |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

| विभाग | मागील बैठकितील प्रकरणे (विद्यार्थी संख्या) | | | मान्यतेसाठी शिफारस करण्यात येणारी एकूण प्रकरणे (विद्यार्थी संख्या) | | | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | मुद्दा क्र.९ | मुद्दा क्र.१० | मुद्दा क्र.११ | मुद्दा क्र.९ | मुद्दा क्र.१० | मुद्दा क्र.११ | |
| कृषी शिक्षण | १३ | ०० | ०९ | ०० | ०० | ०० | ०० |
| कला शिक्षण | २१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| एकुण | ४२७० | ८३ | ११९ | १८२० | ०६ | ३७ | १८६३ |

उपरोक्त तक्त्यात नमुद अहवालाबाबत मा. प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला होता. अहवालातील महाविद्यालयनिहाय विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी सविस्तर चर्चा करुन, खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ. क्र. | विभाग | प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार प्रलंबित प्रकरणे | | प्राधिकरणाच्या बैठकीतील निर्णयानुसार निपटारा करण्यात आलेली प्रकरणे | | | | | | शिल्लक प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संस्था | विद्यार्थी | मान्यता देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | दंडाच्या कारवाईसह मान्यता दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | संस्थेकडून खुलासा मागविण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | मान्यता न दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | प्रवेश रद्द केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या | एकुण | |
| | | | | प्रपत्र-अ | प्रपत्र-ब | प्रपत्र-क | प्रपत्र-ड | प्रपत्र-इ | | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) |
| १ | तंत्रशिक्षण | ९८ | ५२१ | ९ | ० | ० | १ | ० | १० | ५११ |
| २ | उच्चशिक्षण | ३८४ | ३४५२ | ९६९ | १८ | २८४ | २३ | ३० | १३२४ | २१२८ |
| ३ | वैद्यकिय शिक्षण | ५० | १७८ | ० | ० | ० | ० | ० | ० | १७८ |
| ४ | आयुष शिक्षण | ४० | ८५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ८५ |
| ५ | कृषिशिक्षण | १२ | १३ | ० | ० | ० | ० | ० | ० | १३ |
| ६ | कलाशिक्षण | २ | २१ | ० | ० | ० | ० | ० | ० | २१ |
| | एकुण | ५८६ | ४२७० | ९७८ | १८ | २८४ | २४ | ३० | १३३४ | २९३६ |

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

१. उपरोक्त तालिकेतील स्तंभ क्र. ५ (प्रपत्र-अ) मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी संचालक, उच्च शिक्षण यांच्या तपासणी अहवालानुसार व महाविद्यालयाने त्रुटीसंदर्भात सादर केलेल्या कागदपत्रानुसार प्रवेशांना मान्यता देण्यात येत आहे. प्रवेश मान्यतेबाबतचा निर्णय संबंधितांना कळविण्यात यावा.

२. तालिकेतील स्तंभ क्र. ६ (प्रपत्र-ब) मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी महाविद्यालयाने कागदपत्रांच्या त्रुटींची पुर्तता विहित कालावधीमध्ये न केल्यामुळे संबंधित महाविद्यालयांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे दंड आकारुन प्रवेशांना मान्यता देण्यात येत आहे. महाविद्यालयांनी सदरचा दंड "सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई" यांच्या नावाने धनाकर्षाच्या स्वरुपात किंवा "६०२४९४८१३२१" (IFSC Code : MAHB०००३१०) या बँक ऑफ महाराष्ट्राच्या बचत खात्यामध्ये NEFT/RTGS द्वारे भरणा करण्यात यावा. तसेच सदरील दंडाची रक्कम संबंधित विद्यार्थी/पालक यांच्याकडून वसूल करण्यात येणार नसल्याचे शपथपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३. तालिकेतील स्तंभ क्र. ७ (प्रपत्र-क) मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी महाविद्यालयांच्या नावासमोर दर्शविल्यानुसार, संचालकांच्या तपासणी अहवालासह प्रवेश मान्यता प्रस्ताव विहित कालावधीमध्ये सादर केलेला नाही, विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबतची आवश्यक कागदपत्रे अद्यापही पडताळणीसाठी सादर केलेली नाहीत, प्रवेश वाटप पत्रात (Allotment Letter) नमूद केलेल्या Method व्यतिरिक्त दुसऱ्या Method मध्ये प्रवेश दिलेला आहे. या कारणास्तव संबंधित महाविद्यालयांना ०१ महिन्यात खुलासा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

अध्यक्ष
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य

४. तालिकेतील स्तंभ क्र. ८ (प्रपत्र-ड) मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी महाविद्यालयांनी आवश्यक कागदपत्रे सादर न केल्यामुळे सदर प्रवेशांना मान्यता नाकारण्यात येत आहे.

५. तालिकेतील स्तंभ क्र. ९ (प्रपत्र-इ) मध्ये नमूद विद्यार्थ्यांनी महाविद्यालय स्तरावर प्रवेश रद्द करण्यात आले आहे.

६. तालिकेतील स्तंभ क्र. ११ मध्ये नमूद विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकरणी प्राधिकरणाच्या दिनांक १७/०४/२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्देशानुसार प्रवेशांची पडताळणी करुन आगामी बैठकीत प्राधान्याने मान्यतेसाठी सादर करण्यात यावे.

**विषय क्रमांक ५ :** **सामाईक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियांसाठी तंत्रशिक्षण विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी अस्तित्वात असलेल्या Facilitation Center प्रमाणे इतर विभागातील प्रवेश प्रक्रियेसाठी विभागीय /जिल्हा / तालुका स्तरावर नव्याने Facilitation Center उभारण्याबाबत विचार विनिमय करणे.**

सदर विषय पुढील बैठकीत सादर करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले.

**<u>विषय क्रमांक ६ :</u>** <u>मान. अध्यक्ष, प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. यांच्या परवानगीने आयत्यावेळच्या</u> **<u>विषयांवर चर्चा करणे व निर्णय घेणे.</u>**

निरंक

वरीलप्रमाणे विषयनिहाय सांगोपांग चर्चा झाली, बैठकीच्या सरतेशेवटी सदस्य सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण तथा आयुक्त व सक्षम प्राधिकारी, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी उपस्थितांचे आभार मानून सदर बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

(समीर कुमार बिस्वास, भा.प्र.से.(से.नि.))
अध्यक्ष,
प्रवेश नियामक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य.

दिनांक :